# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/06/2023 (शुक्रवार) सकाळ


---

### अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक
### —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दिनांक १५/०६/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे कन्हान उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना गोपनिय मुखबिरकडुन माहिती मिळाली की, एक इसम पोलीस स्टेशन कन्हान हद्दीत अवैधरीत्या अग्नीशत्र बाळगून काहीतरी गंभीर गुन्हा करण्याचे उद्देशाने फिरत असलेल्या रामटेक येथे राहणारा **आरोपी नामे— राहुल भारत फुलझेले वय २५ वर्ष, रा. रामटेक** हा आपले जवळ देशी कट्टा बाळगून अप्रीय घटना करण्याचे उद्देशाने डुंबरी बस स्टॉप येथे बसून आहे अशा मिळालेल्या खबरेवरून आरोपीस पकडले असता त्याला ताब्यात घेऊन पंचा समक्ष त्यांची झडती घेतली असता त्याचे अंगझडतीत एक लोखंडी देशी कट्टा किंमती अंदाजे ३०,०००/—रू. एक जिवंत कारतुस किंमती अंदाजे १०००/—रू. सह मिळुन आला. सदर हत्यारा बाबत आरोपीला परवाना विचारला असता त्याच्या जवळ कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे मिळुन आले नाही. आरोपीला जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कार्यवाही करीता पोलीस ठाणे कन्हान यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक अनिल राऊत, पोलीस हवालदार, नाना राऊत, ईकबाल शेख, पोलीस नायक वीरू नरड, मोनू शुक्ला, पोलीस शिपाई अभिषेक देखमुख यांचे पथकाने केली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर